अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला प्रदान

करणेबाबत....

# महाराष्ट्रशासन

## अल्पसंख्याक विकास विभाग

## शासननिर्णयक्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.१०९/१०/कार्या-५

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक :०१ जुलै २०१३

वाचा-

१) **शासननिर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/२०१२/का-५, दि.२७ मे २०१३**

**प्रस्तावना:-**

राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शासन अनुदानित तसेच कायम विना अनुदानित शैक्षणिक संस्थांद्वारा राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात संबंधीत अल्पसंख्यांक उमेदवारांना प्रवेश देतांना अशा उमेदवाराच्या, प्रसंगपरत्वे धार्मिक वा भाषिक संबधतेबाबतचा पुरावा म्हणून कोणती कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत, तसेच राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक पातळीवर अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला देण्यात यावा किंवा कसे, या बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

**शासननिर्णय-**

राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शासन अनुदानित तसेच कायम विना अनुदानित शैक्षणिक संस्थांद्वारा राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात संबंधीत अल्पसंख्यांक उमेदवारांना प्रवेश देतांना अशा उमेदवाराच्या, प्रसंगपरत्वे धार्मिक वा भाषिक संबधतेबाबतचा पुरावा म्हणून कोणती कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत, तसेच राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक पातळीवर अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला देण्यात यावा किंवा कसे, याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक पातळीवर शासनाकडून अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला देण्यात येणार नाही.

२) राज्यातील सर्व शासन अनुदानित तसेच कायम विना अनुदानित शाळा / शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना विद्यार्थ्यांच्या धर्म तसेच मातृभाषे विषयी खातरजमा करावी व सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश निर्गमन उताऱ्यात तसेच शाळा सोडल्याचा दाखला / प्रमाणपत्रात विद्यार्थ्यांच्या धर्म तसेच मातृभाषेविषयी विनिर्दिष्टपणे उल्लेख करावा. या बाबींची खातरजमा करण्यासाठी शाळा / शैक्षणिक संस्था यांनी संबंधित अल्पसंख्याक समाजाच्या संघटनेने किंवा धर्म प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र (उदा.बप्तिस्मा प्रमाणपत्र, दिक्षा प्रमाणपत्र इ.) यासह संबंधित विद्यार्थ्यां पालकांचे धर्म किंवा मातृभाषेविषयीचे शपथपत्र, पुरावा म्हणून ग्राह्य धरावा.

३) महाविद्यालये वा उच्च माध्यमिक / व्यावसायिक तसेच उच्च शिक्षण देणा-या इतर तत्सम संस्थानी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रातील विद्यार्थ्यांच्या धर्म वा मातृभाषेविषयी नोंदी प्रमाण मानाव्यात व त्या आधारे अल्पसंख्याक लोकसमुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

४) दरम्यानच्या कालावधीत, शाळा सोडल्याच्या दाखला / प्रमाणपत्रात विद्यार्थ्यांच्या धर्म वा मातृभाषेविषयी उल्लेख करण्यात आलेला नसेल अशा प्रकरणी संबंधित अल्पसंख्याक समाजाच्या नोंदणीकृत संघटनेने अथवा धर्म प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र उदा.बप्तिस्मा प्रमाणपत्र, दिक्षा प्रमाणपत्र इ.यांच्यासह संबंधित विद्यार्थ्यां पालकांचे धर्म किंवा मातृभाषेविषयीचे शपथपत्र, पुरावा म्हणून ग्राह्य मानन्यात यावा, व त्या आधारे महाविद्यालये वा उच्च माध्यमिक / व्यावसायिक तसेच उच्च शिक्षण देणाऱ्या इतर तत्सम संस्थांनी अल्पसंख्याक लोकसमुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. (नमूद केलेले पुराव्यांपैकी कुठलाही एक पुरावा असल्यास गृहीत धरुन प्रवेश द्यावा.)

५) प्रवेश निर्गमित उताऱ्यातील तसेच शाळा सोडल्याचा दाखला / प्रमाणपत्रातील विद्यार्थ्यांच्या धर्म तसेच मातृभाषे विषयीच्या नोंदी आवश्यकतेनुसार इतर प्रसंगीदेखील अल्पसंख्याक असल्याबाबतचा पुरावा म्हणून गृहीत धरण्यात याव्यात.

२. वरील निदेशाचे राज्यातील सर्व शांळा/महाविद्यालये/उच्च माध्यमिक/ व्यवसायिक वा उच्च शिक्षण देणाऱ्या सर्व तत्सम शैक्षणिक संस्था तसेच इतर सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

३. हे आदेश, शालेय शिक्षण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७०२१६४४०६२४१४असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Thanksy Francis Thekkekara

Digitally signed by Thanksy Francis Thekkekara
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITY DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Thanksy Francis Thekkekara
Date: 2013.07.03 15:40:21 +05'30'

**(डॉ.टी.एफ.थेक्केकरा)**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, मुंबई - ४००००१.

३. संचालक, आयुर्वेद संचालनालय, दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, मुंबई - ४००००१.

४. संचालक, शालेय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

६. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.

७. संचालक, व्यावसायिक शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.

८. संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

९. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

१०. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (अ.वि.वि.), मंत्रालय, मुंबई.

११. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.

१२. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई.

१३. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण), मंत्रालय, मुंबई.

१४.सर्व अल्पसंख्याक अनुदानित / विनाअनुदानित शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र राज्य.

१५.निवडनस्ती